# अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२० /२०२५ दि.२४/०६/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीतील कल्याण बदलापुर हा राज्य महामार्ग नं.७६ हा अत्यंत महत्वाचा असुन सदर रोडवर मोठया प्रमाणात वाहतूक चालु असते. तसेच महामार्गालगत अतिसंवेदनशील असे ऑर्डनन्स फॅक्टरी आहे. सदर रोडच्या कडेला अनेक वाहने ही अस्ताव्यस्त पार्कींग करत असतात. त्यामुळे सदर रोडवर वाहतूक कोडी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा मंदिर ते मटका चौक सिग्नलपर्यंत मटका चौक जवळील टेम्पो स्टॅन्ड सोडुन | नो पार्कीग | दोन्ही बाजुस १५०० मिटर | २४ तास |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट व आतील परिसरा पर्यंत | नो पार्कीग | १०० मिटर | २४ तास |
| ३ | पोलीस पेट्रोल पंप ते छाया हॉस्पीटल पर्यंत | नो पार्कीग | १५० मिटर | २४ तास |
| ४ | महात्मा गांधी चौक ते पटेल आर मार्ट पर्यंत सुश्रृत हॉस्पीटल समोरील रिक्षा स्टॅन्ड सोडुन | नो पार्कीग | ५० मिटर | २४ तास |
| ५ | सिध्दार्थ नगर ते होमगार्ड ऑफिस पर्यंत | नो पार्कीग | ५० मिटर | २४ तास |
| ६ | वेल्फेअर रिक्षा स्टॅन्ड ते अश्विनी हॉस्पीटल पर्यंत | नो पार्कीग | २०० मिटर | २४ तास |
| ७ | बी केबीन रोड ते मोतीराम पार्क जंक्शन पर्यंत | नो पार्कीग | १५०० मिटर | २४ तास |
| ८ | गजानन महाराज मठाला लागुन असलेला गोलाकार रस्त्या पर्यंत | नो पार्कीग | १०० मिटर | २४ तास |
| ९ | स्टेट बॅक ऑफ इंडिया, रोटरी क्लब शाळा ते बर्वे वॉच दुकानापर्यंत | नो पार्कीग | १०० मिटर | २४ तास |
| १० | बबन वडापाव ते रेल्वे स्टेशन रोड पर्यंत | नो पार्कीग | १०० मिटर | २४ तास |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेट बॅक ऑफ इंडीया पर्यंत रिक्षा स्टॅन्ड सोडुन | नो पार्कीग | २०० मिटर | २४ तास |
| १२ | मुंबई बार ते शगुन बार गल्ली पर्यंत | नो पार्कीग | १०० मिटर | २४ तास |
| १३ | लादीनाका रिक्षा स्टॅन्ड ते साईबाबा मंदिर पाण्याची टाकी पर्यंत | पी – १, पी – २ | १०० मिटर | २४ तास |
| १४ | हुतात्मा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबरनाथ पुर्व पर्यंत | पी – १, पी – २ | ७०० मिटर | २४ तास |
| १५ | छत्रपती शिवाजी महाराज चौक ते वेल्फेअर रिक्षा स्टॅन्ड पर्यंत | पी – १, पी – २ | ३०० मिटर | २४ तास |
| १६ | मेन रोड ते सोनम क्लास पर्यंत | पी – १, पी – २ | १०० मिटर | २४ तास |
| १७ | मटका चौक ते तहसिलदार कार्यालया पर्यंत | दोन्ही बाजुस सिंगल पार्कींग | १०० मिटर | २४ तास |
| १८ | राजेश मोबाईल दुकान ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन पर्यंत | पी – १, पी – २ सिंगल पार्कीग | १०० मिटर | २४ तास |

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, अंबरनाथ वाहतूक शाखा.

CamScanner